RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २०(३)] सोमवार, जुलै १३, २०२६/आषाढ २२, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ३९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.— महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	**पृष्ठे** १-४

दिनांक ११ जुलै २०२६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सुप्रिया धावरे,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १३ जुलै २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

२०२४ चा महा. ८.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,– २०२४ चा महा. ८.

(एक) खंड (ख) मधील, " विद्याविषयक " या मजकुरानंतर, ",आरोग्य विज्ञान" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (ढ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(ढ-क) "आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम" याचा अर्थ, वैद्यकीय, दंत वैद्यक, आयुर्वेद, समचिकित्सा (होमिओपॅथी), युनानी, सिद्ध, भौतिकोपचार, व्यवसाय उपचार, परिचर्या, पुनर्वसन, परावैद्यक पाठ्यक्रम व संलग्न आरोग्य विज्ञान यांच्याशी संबंधित असलेले पाठ्यक्रम, असा आहे;";

(तीन) खंड (प) मधील, "भारतीय वैज्ञानिक व संशोधन परिषद" या मजकुरानंतर, ",राष्ट्रीय दंतवैद्यक आयोग, भारतीय परिचर्या परिषद, राष्ट्रीय संलग्न व आरोग्य सेवा व्यवसाय आयोग, भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, भारतीय पुनर्वसन परिषद, राष्ट्रीय समचिकित्सा आयोग व आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांच्या इतर कोणत्याही सक्षम नियामक संस्था," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(चार) खंड (यख) मधील, " पदविका, पदवी" या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, अधिछात्रवृत्ती, विद्यावाचस्पती, विद्यावाचस्पत्युत्तर पदवी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (बावीस) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(बावीस-क) आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांच्या बाबतीत, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) नुसार, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून मिळालेले ना-हरकत प्रमाणपत्रः १९९९ चा महा. १०.

परंतु, जर अर्जदार प्रायोजक मंडळास, अर्ज केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही तर, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि अशा प्रकरणांमध्ये, विनंती अर्जाची पोचपावती सादर करण्यात येईल;".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मध्ये नवीन कलम ४क समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः-

आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारी विद्यापीठे स्थापन करण्याची पात्रता.

"**४क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या प्रायोजक मंडळाचे, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) 'अ' व त्यावरील श्रेणीच्या मानांकासह (एकत्रित श्रेणी गुण सरासरी (सीजीपीए) ३.०१ व त्यापेक्षा अधिक) आरोग्य विज्ञान शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असलेले मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय आहे आणि ज्यामधील किमान पन्नास टक्के विद्याशाखांमध्ये पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू आहेत आणि ते किमान दहा वर्षांपासून कार्यरत आहे, केवळ तेच प्रायोजक मंडळ या अधिनियमान्वये आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारे विद्यापीठे स्थापन करण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असेल.".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (५) मधील, " पदवी, पदविका, किंवा प्रमाणपत्र" या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, अधिछात्रवृत्ती, विद्यावाचस्पती पदवी किंवा विद्यावाचस्पत्युत्तर पदवी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः- सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

" परंतु, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांसाठी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे, वित्त विभागाचे व नियोजन विभागाचे सचिव यांचा समावेश असलेली, स्वतंत्र सचिव स्तरीय समिती असेल.".

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१) मध्ये,- सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ९ ची सुधारणा.

(एक) खंड (क) मधील, " माहिती व दळणवळण तंत्रज्ञान" या मजकुरानंतर, ",आरोग्य विज्ञान, म्हणजेच वैद्यकीय, दंत वैद्यक, आयुर्वेद, समचिकित्सा (होमिओपॅथी), युनानी, सिद्ध, भौतिकोपचार, व्यवसाय उपचार, परिचर्या, पुनर्वसन, परावैद्यक पाठ्यक्रम व संलग्न आरोग्य विज्ञान " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

१९६१ चा २५. २०१९ चा ३०. २०२०चा १४. १९४७ चा ४८. २०२३ चा २१. १९९२ चा ३४. २०२१ चा १४. २०२० चा १५.

(दोन) खंड (त) मधील, " अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेल्या भारतीय वकील परिषदेने" या मजकुरानंतर, "किंवा राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम,२०१९ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने किंवा भारतीय वैद्यक पद्धती राष्ट्रीय आयोग अधिनियम,२०२० अन्वये घटित केलेल्या भारतीय वैद्यक पद्धती राष्ट्रीय आयोगाने किंवा भारतीय परिचर्या परिषद अधिनियम, १९४७ अन्वये घटित केलेल्या परिषदेने किंवा राष्ट्रीय दंतवैद्यक आयोग अधिनियम,२०२३ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय दंतवैद्यक आयोगाने किंवा भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम,१९९२ अन्वये घटित केलेल्या भारतीय पुनर्वसन परिषदेने किंवा राष्ट्रीय संलग्न व आरोग्य सेवा व्यवसाय आयोग अधिनियम, २०२१ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय संलग्न व आरोग्य सेवा व्यवसाय आयोगाने किंवा राष्ट्रीय समचिकित्सा आयोग अधिनियम, २०२० अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय समचिकित्सा आयोगाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये,- सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १० ची सुधारणा.

(एक) खंड (दोन) मधील, " पुरस्कार, श्रेण्या, श्रेयांक व विद्याविषयक विशेषोपाध्या" या मजकुराऐवजी, " पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या, विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या, पुरस्कार, श्रेण्या, श्रेयांक व विद्याविषयक विशेषोपाध्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (सोळा) मधील, " किंवा प्रमाणपत्रे" या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्रे, पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या किंवा विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (५) मधील, " उच्च शिक्षण संचालकाकडून " या मजकुरानंतर, "आणि आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या बाबतीत, संयुक्त धारक म्हणून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालकाकडून" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १३ ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ग) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :- सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २७ ची सुधारणा.

"परंतु, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या बाबतीत, पाच व्यक्तींपैकी, प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेले दोन आरोग्य विज्ञान तज्ज्ञ असतील.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील, पोट-कलम (२) मध्ये,-

(एक) खंड (ग) मधील, " पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे " या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्रे पदविका, पदव्या, पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या, विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (च) मध्ये, " पदव्या व पदविका " या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्रे, पदविका, पदव्या, पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या व विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ मध्ये,-

(एक) पोट-कलम (२) मधील, पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

" परंतु आणखी असे की, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी विद्यापीठांमधील प्रवेश, राष्ट्रीय पात्रता-नि-प्रवेश परीक्षेच्या (नीटच्या) किंवा केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या इतर कोणत्याही प्रवेश चाचणीच्या आधारे देण्यात येतील;" ;

(दोन) पोट-कलम (३) मधील, "आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस)" या मजकुरानंतर, "आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(तीन) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः-

"(५) आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी, संबंधित नियामक मंडळाने ठरविलेल्या सामाईक समुपदेशन प्रक्रियेमार्फत प्रवेश देण्यात येतील.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः-

"(७) राज्य शासनास,-

(क) विद्यापीठाकडून अनुपालन अहवाल मागविता येईल;

(ख) संबंधित नियामक मंडळाच्या परवानग्यांच्या आधारे, पुढे चालू ठेवण्याच्या स्थितीचे पुनर्विलोकन करता येईल;

(ग) संबंधित नियामक मंडळाने परवानगी काढून घेतल्यास किंवा निलंबित केल्यास प्रवेशांवर निर्बंध घालता येतील.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.